# कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार व महाराष्ट्र शासन द्वारा प्रायोजित

कृषि विभाग
महाराष्ट्र शासन

## प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)

(खरीप हंगाम २०२३) सुरक्षित शेतकरी ! सक्षम शेतकरी !

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे आणि आर्थिक पाठबळ देणे हा प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे आणि त्यांना नाविन्यपूर्ण व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यास प्रोत्साहन देऊन शेती व्यवसाय निरंतर सुरु राहील याची काळजी घेतली जाते.



### ह्या योजनेचा कोणाला फायदा होऊ शकतो

सदरची योजना ही अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील केवळ अधिसूचित पिकांसाठी असेल. अधिसूचित क्षेत्रातील पिकांसाठी खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहे. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी अधिसूचित पिकासाठी कोणत्याही वित्तीय संस्थांकडून (सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, वाणिज्य बँका, खाजगी बँका आणि वगैरे) हंगामी पिक कर्ज घेतले आहे आणि जे अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर योजनेतून बाहेर पडलेले नाहीत असे शेतकरी त्यांच्या वित्तीय संस्थाद्वारे योजनेत नाव नोंदणी करण्यास पात्र असतील.

### जोखमीच्या बाबी

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यास टाळता न येण्या जोग्या कारणामुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण मिळेल.

- **प्रतिकूल हवामान घटकामुळे पेरणी /लावणी/ उगवण न होणे :** हंगामातील अपुरा पाऊस, हवामानातील इतर घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे केवळ अधिसूचित मुख्य पिकांची अधिसूचित क्षेत्रात व्यापक प्रमाणावर पेरणी /लावणी होऊ न शकलेल्या क्षेत्रासाठी पेरणी/ लावणी न झालेले क्षेत्र हे सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्के पेक्षा जास्त असल्यास विमा संरक्षण देय राहील.
- **हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान:** सर्वसाधारण काढणीच्या १५ दिवस आधीपर्यंत पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबीमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पादनामध्ये मागील लगतच्या सात वर्षांच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर विमा संरक्षण देय राहील.
- **पीक पेरणी पासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट:** दुष्काळ, पावसातील खंड, पूर, क्षेत्र जलमय होणे, कीड व रोगांचा व्यापक प्रादुर्भाव, भूस्खलन, नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट आणि चक्रीवादळ यासारख्या टाळता न येणाऱ्या जोखमीमुळे पिकांच्या उत्पादनात येणाऱ्या घटीपासून व्यापक संरक्षण दिले जाईल.
- **स्थानिक नैसर्गिक आपत्ती:** या बाबी अंतर्गत गारपीट, भूस्खलन, विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी अथवा वीज कोसळल्यामुळे लागणारी नैसर्गिक आग या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त झाल्यामुळे होणारे अधिसूचित पिकाचे ठराविक क्षेत्रातील नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून निश्चित करण्यात येईल. नुकसानग्रस्त शेतकऱ्याने ७२ तासाच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर किंवा विमा कंपनी प्रतिनिधी, थेट संबंधित बँक, स्थानिक कृषी विभाग जिल्हा अधिकाऱ्यांमार्फत गावाची माहिती द्यावी.



- **काढणी पश्चात नुकसान:** ज्या पिकांची कापणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंढ्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अशा कापणी /काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकाचे कापणीनंतर १४ दिवसाच्या आत गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे नुकसान झाल्यास वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून मार्गदर्शक निकषांचे व विमा संरक्षित रकमेच्या अधिन राहून नुकसान भरपाई निश्चित केली जाईल.
नुकसानग्रस्त शेतकऱ्याने ७२ तासाच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री



क्रमांकावर किंवा विमा कंपनी प्रतिनिधी, थेट संबंधित बँक, स्थानिक कृषी विभाग, जिल्हा अधिकाऱ्यांमार्फत दाव्याची माहिती द्यावी.

## योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

- आधारकार्ड (बंधनकारक)
- पिकांची नोंद असलेला सातबारा उतारा
- संपूर्ण भरलेले विमा प्रस्ताव अर्ज
- पिक लागवड स्वयंघोषणा पत्र
- बँक पासबुक किंवा रद्द केलेला धनादेश
- भाडेतत्त्वावरील शेती असल्यास नोंदणीकृत भाडेकरार

**ई-पीक पाहणी:** ई-पीक पाहणी अंतर्गत पिकाची नोंद करण्यात यावी. विमा योजनेत विमा घेतलेले पीक व ई-पीक पाहणीमध्ये नोंदविलेले पीक यामध्ये तफावतीचा मुद्दा उद्भवल्यास ई-पीक पाहणीमध्ये नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येईल.

## संरक्षण आणि दाव्यासाठी पूर्वअटी

**प्रतिकूल हवामान घटकामुळे पेरणी लावणी उगवण न झालेले क्षेत्र:** सरासरी पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी लावणी होऊ न शकलेले अधिसूचित विमा क्षेत्र घटक नुकसान भरपाईस पात्र राहील. विविध प्रतिनिधिक सूचकांच्या निर्देशका द्वारे आधारित राज्य शासनाद्वारे ही तरतूद लागू करण्यात येते सदर जोखीम लागू करण्यासाठी अंतिम मुदत ही पीक पेरणीच्या अंतिम मुदतीच्या एक महिन्यापेक्षा अधिक नसावी तसेच विमा नोंदणी करून योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीनंतर पंधरा दिवसाच्या आत या तरतुदीची अधिसूचना जाहीर करणे आवश्यक असते. अधिसूचना जाहीर झाल्यानंतर विमा अनुदान मिळण्याच्या अधीन राहून ३० दिवसाच्या आत नुकसान भरपाई देण्यात येईल.

**हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान:** हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत उदा. पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अपेक्षित उत्पादनामध्ये सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर अशा पिकांना ते लागू आहे. अधिसूचित विमा क्षेत्रामध्ये प्रतिनिधिक सूचकांच्या आधारे राज्य शासनाद्वारे ठराविक पिकांसाठी किंवा पिकांच्या गटासाठी ही तरतूद लागू केली जाऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीत ही सर्वसामान्य काढणी वेळेच्या पंधरा दिवस अगोदर आली तर सदर तरतूद लागू राहणार नाही व नुकसान भरपाईस देय होणार नाही. ही तरतूद लागू केल्या नंतर अपेक्षित नुकसान भरपाई रकमेच्या २५ टक्के मर्यादेपर्यंत नुकसान भरपाईची आगाऊ रक्कम देण्यात येणार आहे व ही मदत अंतिम येणाऱ्या नुकसान भरपाईतून समायोजित करण्यात येईल.

**हंगामाच्या अखेरच्या उत्पन्नावर आधारित नुकसान:** या योजनेअंतर्गत निश्चित होणारी नुकसान भरपाई ही शासनाने निर्धारित केलेल्या विमा क्षेत्र घटकातील पीक कापणी प्रयोगावरून उपलब्ध झालेल्या उत्पादनाच्या सरासरी आकडेवारीवर आधारित असेल. जर एखाद्या निधारित क्षेत्रातील विमा संरक्षित पिकाचे त्या वर्षाचे दर हेक्टरी सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आले तर त्या क्षेत्रातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असे गृहीत धरण्यात येईल.

**काढणी पश्चात नुकसान आणि स्थानिक नैसर्गिक आपत्ती:** अधिसूचित पिकांचे नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून निश्चित करण्यात येईल. विमाधारक शेतकऱ्याने आपत्तीनंतर ७२ तासाच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक १८००२६०७०० किंवा क्रॉप इन्शुरन्स ॲप वर माहिती कळवणे आवश्यक आहे. या माहितीत ७/१२ वरील सर्वे नंबर नुसार पिकांचा तपशील आणि हेक्टरी नुकसान याचा समावेश असावा. शेतकरी परिपूर्ण माहितीसह विहित नमुन्यातील अर्ज सादर करू न शकल्यास उपलब्ध माहितीच्या आधारे अर्ज सादर करू शकतो, परंतु अर्जातील उर्वरित माहिती सात दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

अधिसूचित पिके, प्रीमियमचा दर आणि प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत विम्याचे रक्कम यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| जिल्हा | पिकांचे नाव | प्रति हेक्टर विम्याची रक्कम (रु. मध्ये) | शेतकरी प्रीमियम (रु. मध्ये) | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| अकोला | ज्वारी | ३०००० | ६००.०० | ३१.०७.२०२३ |
| | सोयाबीन | ५४००० | १०८०.०० | ३१.०७.२०२३ |
| | मूग | २२८०० | ४५६.०० | ३१.०७.२०२३ |
| | उडीद | २२८०० | ४५६.०० | ३१.०७.२०२३ |
| | तूर | ३६८०२ | ७३६.०४ | ३१.०७.२०२३ |
| | कापूस | ५१६०० | २५८०.०० | ३१.०७.२०२३ |

***सर्वसमावेशक पिक विमा योजनेनुसार शेतकरी अर्जदारांनी योजनेत सहभाग घेताना प्रति अर्ज रक्कम रु. १ भरुन पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे.**

### अधिक माहितीसाठी जिल्हानिहाय जिल्हा प्रतिनिधी

| जिल्हा | जिल्हा प्रतिनिधी | मोबाईल क्र. | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| अकोला | सुनिल भालेराव | ९९२१२५००३३ | sunil.bhalerao1@hdfcergo.com |

**आपले सरकार सेवा केंद्र (CSC) धारकास विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज रु. ४०/- अदा करत असल्याकारणाने शेतकऱ्यांना अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही.**

बिगर कर्जदार शेतकरी आपल्या पिकाचा विमा जवळच्या वित्तीय संस्थेमार्फत घेऊ शकतात. उदा. राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, प्राथमिक कृषि सहकारी सोसायटी (पीएसीएस), प्रादेशिक ग्रामिण बँका/विमा मध्यस्थ/आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी)/https://pmfby.gov.in/farmerLogin वेबसाईट लिंक द्वारे स्वत:च्या पिकाची नोंदणी करू शकतात.



**योजने संबंधीत अधिक माहितीसाठी, टोल फ्री क्रमांक: १८०० २६६० ७०० वर संपर्क साधा.**

**ईमेल: pmfby.maharashtra@hdfcergo.com**

एचडीएफसी एर्गो जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड. आयआरडीएआय नोंदणी क्र. 146. सीआयएन: U66030MH2007PLC177117. नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: 1ला मजला, एचडीएफसी हाऊस, 165-166, बॅकबे रिक्लमेशन, एच्. टी. पारेख मार्ग, चर्चगेट, मुंबई - 400 020. जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधी अधिक माहितीसाठी कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी विक्रीची माहितीपुस्तिका/प्रॉस्पेक्टस काळजीपूर्वक वाचा. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे एचडीएफसी बँक लिमिटेड आणि एर्गो इंटरनॅशनल एजी यांच्या मालकीचे आहेत आणि कंपनीद्वारा त्यांचा परवानन्या अंतर्गत उपयोग करण्यात आला आहे. UIN: Pradhan Mantri Fasal Bima Yojana - IRDAN125P0003V01201617 | CSC - Pradhan Mantri Fasal Bima Yojana - HDE-AG-P18-25-V01-17-18. UID: 12911.